
क्र. १२७ पहिले वर्ष

५ फेब्रुवारी २०२३

# रविवारची  उपासना

## सामान्यकाळातील पाचवा रविवार

### प्रस्तावना

आजच्या शुभवर्तमानात प्रभू येशू म्हणतो ''मीच जगाचा प्रकाश आहे, जो मला अनुसरतो तो अंधारात चालणार नाही तर त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश राहील.'' ज्यांनी ह्या जीवनाच्या प्रकाशाचा श्रध्देने स्वीकार केला आहे. त्यांचे जीवन प्रकाशमान बनते. आपल्या प्रत्येकाला जीवनात प्रकाशाचे वरदान लाभावे हा तारणदायी प्रकाश आपण इतरांचे जीवन प्रकाशमय करण्यास कृपा द्यावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या.**

हे प्रभो, तुझ्यावर आम्ही पूर्णपणे विसंबून आहोत. तुझ्या कुटुंबावर कृपादृष्टी ठेव. तुझ्या कृपाछत्राखाली आम्हांला सुरक्षित ठेव. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्दविधी**

### पहिले वाचन

**यशया या पुस्तकातून घेतलेले वाचन** ५८:७-१०

**''तुझा प्रकाश प्रभातीप्रमाणे फाकेल.''**

परमेश्वर म्हणतो, तू आपले अन्न भुकेल्यांस वाटावे, तू लाचारांस आणि निराश्रीतांस आपल्या घरी न्यावे, उघडा दृष्टीस पडल्यास त्यास वस्त्र द्यावे. तू आपल्या बांधवांपुढे तोंड लपवू नये हाच तो उपवास आहे असे करशील तर तुझा प्रकाश प्रभातीप्रमाणे फाकेल, तुझी जखम लवकर भरेल. तुझी धार्मिकता तुझ्यापुढे चालेल आणि परमेश्वराचा गौरव तुझा पाठीराखा होईल. जेव्हा तू हाक मारशील तेव्हा ती परमेश्वर ऐकेल, तू धावा धरशील तेव्हा तो म्हणेल, हा मी आहे.''

''जर तू आपल्यामधून जोखंड लादण्याचे सोडून देशील, बोट दाखविण्याचे आणि दुष्ट गोष्टी बोलण्याचे टाकून देशील, जर तू आपल्या मनाला योग्य ते भुकेल्यांस देशील, तू दु:खग्रस्त जिवांस तृप्त करशील, तर तुझा प्रकाश अंध:कारात झळकेल, निबिड अंधकार तुला मध्यान्हाचे तेज असा होईल.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**१११:४-५, ६-७, ८अ-९**

प्रतिसाद : **सुजनांस अंध:कारात प्रकाश प्राप्त होतो.**

१. सुजनास अंध:कारात प्रकाश प्राप्त होतो;
त्याच्याठायी कृपा, दया आणि न्याय ही आहेत. जो मनुष्य दया दाखवतो आणि उसने देतो त्याचे कल्याण होते, तो न्यायाने आपला व्यवसाय करील.

२. तो कधीही ढळणार नाही; नीतिमानाचे स्मरण सर्वकाळ राहील. तो वाईट बातमीला भिणार नाही, त्याचे मन परमेश्वरावर भाव ठेवून अढळ राहते.

३. त्याचे मन स्थिर असते. त्याने सढळ हाताने गरिबांस दान दिले आहे; त्याचे नीतिमत्व सर्वकाळ राहील. त्याचा सन्मानपूर्वक उत्कर्ष होईल.

### दसरे वाचन

**पौलचे करिंथकरांस पहिले पत्र यातून घेतलेले वाचन २:१-५**

**''येशू ख्रिस्त, म्हणजे क्रूसावर खिळलेला येशू ख्रिस्त, ह्याच्याशिवाय मी तुमच्याबरोबर असताना दुसरे काही जमेस धरू नये असा मी ठाम निश्चय केला.''**

बंधुजनहो, मी तर तुमच्याकडे आलो तो वक्तृत्वाच्या अथवा ज्ञानाच्या श्रेष्ठतेने देवाचे रहस्य तुम्हांस सांगत आलो असे नाही. येशू ख्रिस्त, म्हणजे क्रूसावर खिळलेला येशू ख्रिस्त, ह्याच्याशिवाय मी तुमच्याबरोबर असताना दुसरे काही जमेस धरू नये असा मी ठाम निश्चय केला आणि मी तुमच्याजवळ अशक्त, भयभीत आणि अतिकंपित असा झालो. तुमचा विश्वास मनुष्यांच्या बुध्दिमत्तेवर उभारलेला नसावा तर देवाच्या सामर्थ्यावर उभारलेला दिसावा म्हणून माझे भाषण आणि माझी घोषणा ज्ञानयुक्त अशा मन वळवणाऱ्या शब्दांची नव्हती तर आत्मा आणि सामर्थ्य ह्यांची निदर्शक होती.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**प्रेषितांची कृत्ये १६:१४**

**आलेलुया, आलेलुया!**

हे प्रभो, तुझ्या पुत्राची वचने स्वीकारण्यासाठी
आमचे अंत:करण प्रफुल्लित कर.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तय लिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन** ५:१३-१६

**''तुम्ही जगाचा प्रकाश आहा.''**

येशू आपल्या शिष्यांस म्हणाला, ''तुम्ही पृथ्वीचे मीठ आहा; पण जर मिठाचा खारटपणाच गेला तर तो खारटपणा त्याला कशाने आणता येईल? पुढे ते बाहेर फेकले जाऊन माणसांच्या पायाखाली तुडविले जाण्यापलीकडे त्याचा कसलाच उपयोग नाही.''

''तुम्ही जगाचा प्रकाश आहा; डोंगरावर वसलेले नगर लपू शकत नाही. दिवा लावून मापाखाली ठेवीत नसतात, दिवठणीवर ठेवतात म्हणजे तो घरातल्या सर्वांना प्रकाश देतो. त्याप्रमाणे तुमचा प्रकाश लोकांसमोर असा पडू द्या की, त्यांनी तुमची सत्कर्मे पाहून तुमच्या

स्वर्गातील पित्याचा गौरव करावा.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू –** बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

**प्रतिसाद : प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले सर्व काही सोडून देऊन ख्रिस्ताचे अनुकरण करणारे आपले पोप फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना आपल्या पाचारणाशी प्रामाणिक राहण्यास पवित्र आत्म्याचे साहाय्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी त्यांना मिळालेल्या अधिकाराचा वापर नागरिकांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी करावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. प्रभूच्या आज्ञेवरून शिमोनने जाळे समुद्रात टाकले व माशांचा मोठा घोळका जाळ्यात सापडला. माणसे धरणारे होण्यासाठी त्यांनी सर्व काही सोडून प्रभूचा माग स्वीकारला. प्रभूच्या तारणदायी प्रकाशाने आपणास इतरांचे जीवन प्रकाशमय करण्यास कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपण पात्र नसतानाही परमेश्वर आपल्यावर अनेक मार्गाने जबाबदारीची कामे सोपवीत असतो आणि ती कामे पूर्ण करीत असताना आपले जीवन सर्वस्वी बदलून जाते. प्रभूच्या ह्या औदार्यावर आपल्याला पूर्णपणे विसंबून राहाता यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेषकरून जे आजारी आहेत अशावर प्रभूचा वरदहस्त असावा, व सर्व नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे तसेच उद्या/आज विवाहबध्द होणाऱ्या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा म्हणून प्रार्थना करू या.
थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

## धर्मगुरू

दयाळू पित्या, आमच्या प्रार्थना ऐक. तुझ्या दिव्य शब्दाद्वारे आमची पुनर्निर्मिती कर म्हणजे तुझ्या शब्दावर विश्वास ठेवून सार्वकालिक जीवन उपभोगण्यास आम्ही पात्र ठरू, ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो परमेश्वरा, आमच्या शरीराच्या पोषणासाठी तू आम्हांला भाकर व द्राक्षरस देतोस. ह्या भाकरीचे व द्राक्षरसाचे रूपांतर आमच्या आध्यात्मिक जीवनाच्या संस्कारात कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे परमेश्वरा, आमच्या स्वर्गीय बापा, एका भाकरीत व एका प्याल्यात आम्हाला सहभागी करून तू आमचे ख्रिस्ताशी ऐक्य घडवून आणतोस. सर्व जगाला तुझे तारण व तुझा आनंद मिळवून देण्यासाठी आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

परमेश्वर मानवाला ज्या मिशनकार्यावर पाठवितो त्यासाठी बायबलमध्ये विविध प्रतिमा वापरण्यात आलेल्या आहेत. आजची वाचने त्यापैकी प्रकाश ही प्रतिमा विविध अर्थांनी वापरतात.

**अ) परमेश्वराचा प्रकाश त्याच्या मिशनऱ्यांच्या जीवनातून परावर्तित होतो :** आजचे पहिले वाचन (यशया ५८:७-१०) उपवासाचा नवीन अर्थ स्पष्ट करते. केवळ स्व-समाधानासाठी केलेला उपवास नव्हे तर शेजाऱ्याचे कल्याण साधणारा उपवास जगात खरा प्रकाश पसरविण्यास साहाय्यक ठरतो.

**ब) परमेश्वरी प्रकाश हा मानवी प्रयत्नाचे फलित नसते :** आजच्या दुसऱ्या वाचनात संत पौल आपल्या प्रभावी वक्तृत्वाचे किंवा बुध्दिमत्तेचे गोडवे गात नसून आपल्या दुर्बळतेतून परमेश्वराची कृपा कशी कार्यरत असते त्यावर भर देताना आढळतो (१ करिंथ. :१-५). अशाप्रकारे स्वत:ला रिक्त करणाऱ्या मिशनऱ्यांमधून प्रभूचा प्रकाश सर्वत्र पसरतो.

**क) मिशनऱ्याचा प्रकाश परमेश्वराच्या गौरवासाठी असतो :** आजच्या शुभवर्तमानात (मत्तय ५:१३-१६) प्रभू येशू आपल्या अनुयायांसाठी 'पृथ्वीचे मीठ' आणि 'जगाचा प्रकाश' अशा दोन प्रतिमा वापरतो. ह्या दोन्ही प्रतिमा जगाच्या कल्याणासाठी वापरल्या जातात. इतरांसाठी झटण्याच्या प्रयत्नात जन्माला येणारी सत्कृत्यांची फळे पाहून लोक परमेश्वराचा गौरव करतात.

**आत्मपरीक्षण :** माझ्या मिशनकार्याद्वारे लोकांना परमेश्वराचा प्रकाश आणि परमेश्वराला लोकांकडून गौरव लाभावा म्हणून मी काय करतो? काय करायला हवे?

●●●

| **फेब्रुवारी २०२३** | **दैनंदिन बायबल वाचने** | **पहिला सप्ताह** |
|---|---|---|
| सोम ०६ | पॉल मिकी व सहकारी (तां) | : उत्पत्ती १:१-१९/मार्क ६:५३-५६ |
| मंगळ ०७ | सं गोन्सालो गार्सिया (तां) | : उत्पत्ती १:२०-२:४/मार्क ७:१-१३ |
| बुध ०८ | सं जेरोम एमिलियानी (हि) | : उत्पत्ती २:४-९,१५-१७/मार्क ७:१४-२३ |
| गुरू ०९ | सं मिंग्वेल कोर्देरो (हि) | : उत्पत्ती २:१८-२५/मार्क ७:२४-३० |
| शुक्र १० | सं स्कोलास्टिका (हि) | : उत्पत्ती ३:१-८/मार्क ७:३१-३७ |
| शनि ११ | लूर्डस माता (हि) | : उत्पत्ती ३:९-२४/मार्क ८:१-१० |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)